गुरुवार दि.१४ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ६८

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## बावनकुळेंची मविआच्या जाहीरनाम्यावर टीका

# मविआचा जाहीरनामा म्हणजे अफवा,ते विकास करणार नाहीत

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज महविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात महाविकास आघाडीकडून पाच हमी देण्यात आल्या आहेत. मात्र, मविआचा जाहीरनामा अफवा असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. ते नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा जाहीरनामा हा अफवा आहे. कारण काँग्रेस विकास करणार नाही, त्यामुळे त्यांच्या जाहीरनाम्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. काँग्रेस लाडकी बहीण योजनेसाठी ३ हजार रुपये देणार असल्याचे म्हणत आहे. पण काँग्रेसवाले खोटारडे आहेत. ही योजना बंद करण्यासाठी ते कोर्टात गेलेत. आम्हाला असल्या योजना परवडणार नाहीत, असे विजय वडेट्टीवारांसह अनेक नेते बोलले आहेत आणि आता तेच योजना परत आणत आहेत, असा हल्लाबोल बावनकुळे यांनी केला. तर आमचे बजेट तयार असून रस्ते, वीज, पाण्यासाठी आम्ही केंद्राकडून पैसे आणू, असे ते म्हणाले.बावनकुळे यांनी राहुल गांधी यांनाही टोला लगावला आहे. राहुल गांधी यांचा पायगुण चांगला नाही. तर मोदीजी हे विश्व गौरव पुरुष आहेत. कोणाचा पायगुण चांगला आहे, हे हरियाणा आणि देशाने पाहिले आहे. मोदी हे देशात विकासासाठी येणार योगपुरुष असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले.चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप खासदार धनंजय महाडिक यांनी महिलांबाबत केलेल्या वादग्रस्त विधानावरही प्रतिक्रिया दिली आहे. महिलांबाबत असे बोलणे चुकीचे आहे. त्यांनी त्या वक्तव्याचे खंडन करून माफी देखील मागितली आहे. भाजपच्या नेत्यांनी यापुढे अशी वक्तव्ये करू नयेत, असा सल्ला बावनकुळे यांनी भाजपच्या नेत्यांना दिला आहे.



# गावोगावी कार्यकर्ते प्रचारात;शेतकरी शिवारात;रब्बी हंगामातील कामे खोळंबली

## कार्यकर्त्याची मागणी वाढली-गावोगावी भोजनाच्या पंगती

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

लोहा-कंधार विधानसभा निवडणूक आणि प्रचार रंगत आला आहे प्रचार सभा,कॉर्नर बैठका,रॅली,भेटीगाठी,संवाद दौरे,आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडू लागल्या आहेत.गावोगावी, वाडी,तांडे,शेत शिवार, गल्लीबोळात प्रचार शिगेला पोहोचला आहे. तालुक्यास जिथे तिथे राजकीय घडामोडींची चर्चा रंगत आहे. राज्याच्या राजकारणाची दशा दिशा ठरवणारी ही निवडणूक आहे.

मतदार संघातील राजकीय प्रवाह कुठल्या दिशेने प्रवाहित होत आहे,ही ठरविणारी विधानसभा निवडणूक आहे.राजकीय वातावरण तापले असताना नोव्हेंबरमध्ये रब्बी हंगामातील पिक पेरणी सुरु झाली आहे. दुसरीकडे मशागतीची कामे सुरु झाली आहे.पण निवडणुकीच्या धामधुमीत प्रचाराचा जोर वाढलेला असताना कार्यकर्ते, तरुणांना मागणी



वाढली आहे. त्यामुळे शेतात कामासाठी मजूर मिळेना झाले आहेत.

शेतकऱ्यांची मोठी आबाळ होत आहे.अनेक भागात मशागतीची कामे,पेरणी पुढे ढकलावी लागत आहे.त्यात कार्तिकी पौर्णिमा आल्याने अनेक उमेदवारांचे समर्थक कार्यकर्त्याची मागणी वाढली- गावोगावी भोजनाच्या पंगती जोरदार तयारीत आहेत. तसेच पंढरपूरच्या कार्तिक एकादशीला विठू माऊलीच्या दर्शनासाठीही मोठया संख्येने भाविक रवाना झाले आहेत.कंधार विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे.रब्बी हंगामात हरभरा, करडई, भुईमुग,गहू, सूर्यफुल, तीळ, सोयाबीन, ज्वारी, बाजरी लागवड केली जाते. भाजीपाला, कांदे, लसूण ही लावला जातो. परतीचा पाऊस आला नसला तरी ऑक्टोबर अखेर तालुक्यात सर्वदूर पाऊस पडला आहे. नोव्हेंबरमध्ये रब्बी हंगामाच्या पेरणीने वेग घेतला आहे. याचं कालावधी दरम्यान विधानसभा लोकसभा पोटनिवडणुकीचा आखाडा रंगला आहे.

गावागावांत चौका चौकात निवडणुकीचे वारे जोमाने वाहत आहे. शेतशिवारात रब्बी हंगामात शेतकऱ्यांना मशागत पेरणीसाठी शेतमजूराची गरज आहे.मजुरांना शेतातील दिवसभरासाठी ५०० रुपये हजेरी झाली आहे. खत टाकणे, तूर फवारणी. पेरणी, मशागत कामे, गवत वेचणी, पाणी टाकणे, कापूस वेचणी, अशी कामे सुरु आहेत. दुसरीकडे निवडणुकीचा प्रचार रंगात आल्याने सभा, रॅली, कॉर्नर बैठका होत आहेत. यात तरुणांचा मोठा सहभाग दिसून येत आहे. तरुणांचा कल राजकारणाकडे जास्त असल्याने शेतावर मजुरीसाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. प्रत्येक कि गावात अशीच परिस्थिती दिसून येत आहे,

## गद्दारांना क्षमा नाही

# सामान्य शिवसैनिकांनी 'शिंदेंना'झळकावले फलक




लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

देऊळगाव राजा येथे एकनाथ शिंदे यांची सभा आयोजित करण्यात आली होती, यावेळी सिंदखेड राजा मतदार संघातील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसैनिक यांनी शिंदेंना गद्दारांना क्षमा नाही अश्या आशयाचे फलक झळकवले.आणि शेवटी हिंदू हृदय सम्राट असे लिहिले होते.

झालेल्या या प्रकारामुळे मतदार संघात आता एकच चर्चा सुरू झाली आहे.यामुळे आता शिवसेना शिंदे गटाची डोकेदुखी वाढल्याचे चित्र आता दिसत आहे.मतदार संघात हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे यांना मानणारा मोठा वर्ग आहे,शिवसेना फोडल्या मुळे हा मोठा निष्ठावन्त शिवसैनिकांमध्ये नाराजीचा सुर खूप दिवसा पासून ऐकू येत होता.आज त्याचा प्रत्येय प्रत्येक्षात आला. बाळा साहेबांच्या शिवसेनेसोबत झालेली गद्दारी ही सामान्य माणसाला पटलेली नाही त्यातूनच आज थेट एकनाथ शिंदे यांना गद्दारांना क्षमा नाही असे पोस्टरच शिवसैनिकांनी दाखवले आहे.

### यंदा नेवासामध्ये परिवर्तन घडवणार: मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल

लोकनेता न्यूज नेटवर्क

नेवासा । प्रतिनिधी

सहकाराचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यात, सहकार क्षेत्रावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. नेवासा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार विठ्ठल लंघे यांच्या प्रचारासाठी नेवासा येथे आलेल्या शिंदेंनी विरोधकांवर हल्लाबोल करत जनतेला महायुतीला साथ देण्याचे आवाहन केले.मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात घराणेशाहीला विरोध दर्शवून, परिवर्तनाची संधी मिळाल्याचे सांगितले. या मतदारसंघातील दादागिरी, दडपशाही आणि भ्रष्टाचार मोडून काढण्याचा निर्धार महायुतीने केला आहे, असे शिंदे म्हणाले

## दरबार ए शायरी

नेते आले गेले
जेते आले गेले !
पण सदनात घेतलेल्या
शपथांचे काय झाले ?
काल कुठे होते अन्
आज कुठे गेले ?
जनतेस दिलेल्या त्या
वचनांचे काय झाले ?

डॉ.विजयकुमार कस्तुरे, ॲडव्होकेट, चिखली.

# नगीनाघाट नांदेड येथे गोदावरी गंगा पुजनाची जय्यत तयारी

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

शुक्रवार दि.१५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता नगीनाघाट नांदेड येथे सतत २४ व्या वर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या गोदावरी गंगापूजनाची जय्यत तयारी झाली असून यामध्ये एकसूत्रीपणा यावा यासाठी उपस्थित राहणाऱ्या शेकडो महिला यावर्षी भगव्या रंगाच्या साड्या परिधान करून येणार आहेत.नांदेडच्या गंगापूजनाची महती देश पातळीवर पोहोचवणाऱ्या माध्यम प्रतिनिधींचा यावेळी लायन्स क्लबच्या वतीने सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक योगेश जायस्वाल व शिवाजी पाटील यांनी दिली आहे.*

धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम

लायन्स क्लब नांदेड सेंट्रल, लायन्स क्लब नांदेड मिड टाऊन, अमरनाथ यात्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी आयोजित करण्यात येतो. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त घेण्यात येणाऱ्या गोदावरी गंगापूजनामध्ये शेकडो महिला एकाच वेळी गोदावरीची आरती करतात. त्यानंतर आपल्या परिवारातील सदस्यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी हजारो दिवे नदीपात्रात सोडले जातात.हे नयनमनोहर दृश्य पाहण्यासाठी नगीनाघाट वर दरवर्षी प्रचंड गर्दी असते. वेळेवर येणाऱ्या एक हजार महिलांचा दरवर्षीप्रमाणे सन्मान करण्यात येणार आहे. प्रतिष्ठित व्यापारी योगेश जायस्वाल यांच्यातर्फे नेहमीप्रमाणे मोफत द्रोण, दिवे व फुले देण्यात येणार आहेत. आकर्षक पूजेची



थाळी सजविणाऱ्या २१ महिलांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच कोस्टल कर्नाटक,गंगासागर, नेपाळ ,केरळ, उत्तर भारत,अंदमान,राजस्थान, दक्षिण भारत, हिमाचल,चारो धाम, अमरनाथ यात्रेसाठी नाव नोंदणी केलेल्या भाविकांचा सन्मान करण्यात येणार आहे. मायेची ऊब उपक्रमांतर्गत ब्लँकेट देणारे दानशूर नागरिक,भाऊचा माणुसकीचा फ्रिज व लायन्सचा डबा, क्षुधाशांती या उपक्रमाच्या अन्नदात्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. संतोषगुरु परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पद्धतीने गोदावरी पूजन करण्यात येणार आहे.सालासार भजन मंडळातर्फे सवाद्य पाच आरत्या म्हणण्यात येणार आहे.कार्यक्रम संपल्यानंतर गुरुद्वारा लंगरसाहब तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सोहळ्याला नांदेडकरांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक योगेश जायस्वाल व शिवाजी पाटील यांनी केले आहे.

# रस्ता खुला करुन द्या अन्यथा मतदानावर बहिष्कार

## सावखेड तेजनच्या ग्रामस्थांचा इशारा;मतदासंघात खळबळ

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

गावात जाणाऱ्या परंतु अडविण्यात आलेला रस्ता खुला करुन देण्यात यावा. अन्यथा विधानसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा तालुक्यातील सावखेड तेजन येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. यामुळे मतदारसंघात खळबळ उडाली आहे.

दि. ११ नोव्हेंबर, सोमवारी सावखेड तेजन येथील ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गावातील गट नं. ८१७ मधील गावात जाणारा रस्ता पूर्वापार वापरला जात होता. परंतु गैर अर्जदार ज्ञानेश्वर माधवराव बुधवत व अन्य काही नागरिकांनी हा रस्ता अडविलेला आहे. रस्ता खुला व्हावा म्हणून, यापूर्वी राजकीय, सामाजिक, आर्थिक आदि अनेक स्तरावर ग्रामस्थांकडून प्रयत्न करण्यात आले होते. मात्र अडविणाऱ्यांनी त्याला दाद दिली नव्हती. त्यामुळे सरते शेवटी यासंदर्भात तहसीलदार, सिंदखेडराजा यांचेकडे अर्ज देऊन दाद मागण्यात आली होती. या अर्जावर सुनावणी होऊन दि. ३१ जुलै रोजी रा. प्र. क. एम. सी. ए. -५/सावखेड तेजन/२/२०२३-२४ या संदर्भ क्रमांकानुसार हा रस्ता खुला करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. नव्हेतर ह्या पारीत करण्यात आलेल्या आदेशाला ६० दिवस मनाई हुकूम नसल्याचे कॅव्हेट आहे. ह्या ६० दिवसांच्या आतच रस्ता खुला करुन देण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. त्यातल्या त्यात विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन, व गैरअर्जदार या आदेशाला न जुमानता रस्ता बंदच ठेवतील



या आशंकेतून, ग्रामस्थांनी दि. १९ नोव्हेंबर मंगळवार पर्यंत रस्ता खुला करुन देण्याची आग्रही मागणी निवेदनात केली आहे. अन्यथा विधानसभा निवडणुकीच्या दि. २० नोव्हेंबर, बुधवारी होणाऱ्या मतदानावर ग्रामस्थ बहिष्कार टाकतील असा इशाराही निवेदनात शेवटी दिला असून, यामुळे मतदान केंद्रावर काही गैरप्रकार झाल्यास त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, अशीही तंबी देण्यात आली आहे.

निवेदनावर डॉ. नंदकिशोर बुधवत, गणेश चाटे, विलास विघ्ने, अशोक कापडी, आनंद वाघ, बद्रीनाथ जायभाये, संदिप पंढरे, बबन बुधवत, दीपक देशपांडे, सुनील मांटे, सचिन आंधळे, शीतल बुधवत, केशव काळुसे, समाधान जायभाये, राजेश बाहेती, प्रभाकर मोरे, कल्पना विघ्ने, नवनीत अचलखांब, कैलास नागरे, गणेश काळे, शुभम हरणे, संतोष पिटकर, जयदीप अवसरमोल, संतोष शेवाळे, संतोष घुले यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.अनेक वर्षांपासून रस्ता बंद करुन ग्रामस्थांची जाणूनबुजून अडवणूक करण्यात आल्याचा हा प्रकार होता. त्यासंदर्भात रस्ता खुला करण्यासंदर्भात आदेशित होऊनही प्रशासकीय गेंड्याची कातडी आडवी आली असण्याची आशंका होती. त्यामुळे गेंड्याच्या कातडीच्या संगनमताने पुन्हा रस्ता बंद पाडण्याचे कारस्थान घडले असते. त्यामुळे सावखेड तेजनच्या ग्रामस्थांनी 'नाक दाबले की तोंड उघडते' या उक्तीप्रमाणे ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या ह्या इशाऱ्याची सर्वत्र चर्चा होत असून, यामुळे सर्वच स्तरावर खळबळ उडाली आहे.

## संपादकीय..

# पक्षांचा लळा, पर्यावरणवादी डॉ.सलीम

सलीम अलींचा १२ नोव्हेंबर हा जन्मदिवस पक्षी दिन म्हणून जाहीर करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले होते. डॉ. सलीम अली हे भारतातील आद्य पक्षिशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी होते. सलीम अली यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील पक्ष्यांचा आढळ, त्यांच्या सवयी, पक्ष्यांच्या विविध जाती आणि जातींमधील वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या ह्या कार्याने भारतात हौशी पक्षिनिरीक्षक बनण्याची परंपरा चालू झाली. भारतातील हे पक्षी निरीक्षक सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांना 'बर्डमॅन ऑफ इंडिया' असे ही संबोधले जाते.

डॉ. सलीम अली आपण पक्षी निरीक्षणाकडे कसे वळलो याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात करतात. मुंबईच्या खेतवाडीमध्ये मुस्लिम कुटुंबात अली यांचा जन्म झाला. लहानपणी भेटवस्तू म्हणून दिलेल्या छर्‍याच्या बंदुकीने लहान पक्षी टिपायचे हा त्यांचा छंद होता. एके दिवशी टिपलेल्या चिमण्यांमध्ये त्यांना वेगळी चिमणी मिळाली. हिच्या गळ्यापाशी पिवळा ठिपका होता. नेहेमीपेक्षा हा पक्षी वेगळा दिसल्याने त्यांची उत्सुकता चाळवली व त्यांनी त्यांच्या मामांकडे हा पक्षी कोणता याची विचारणा केली. मामा त्याला थट बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संचालकांकडे घेऊन गेले. तेथे संचालकांनी छोट्या अलीला हा पक्षी कोणता हे सविस्तर सांगितले, तसेच भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. भारावललेल्या सलीम अलींना पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच.

यानंतरच्या काळात सलीम अलींचा पक्षिछंद त्यांना टिपणे व नोंदी करणे यापुरता मर्यादित राहिला. शालेय शिक्षणानंतर त्यांना प्राणी शास्त्रात पदवी घ्यायची होती परंतु शास्त्रातील अनेक अवघड विषयांमुळे माघार घ्यावी लागली. दरम्यान ते ब्रम्हदेशातील आपल्या बंधूंच्या धंद्याला मदत म्हणून रंगूनला गेले. तेथे धंद्यात मदतीसोबत त्यांनी ब्रम्हदेशातील जंगले फिरून पक्ष्यांना टिपून त्यांच्या नोंदी ठेवायचा छंद चालू ठेवला. १९१८ मध्ये त्यांचा तेहमिना यांच्यांशी विवाह झाला. एका यशस्वी पुरुषामागे पत्नीचा हात असतो ही म्हण सलीम अलींच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.१९२४ मध्ये रंगून मधील धंद्यात अपयश आल्यानंतर अली भारतात परत आले. दरम्यान तेहमिना यांनी सलीम अलींचा पक्ष्यांबद्दलचा कल जाणून घेतला होता व ज्यात त्यांचा छंद जोपासला जाईल अशी नोकरी करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. परंतु सलीम अलींचे शिक्षण अशी नोकरी मिळवण्यास एकदम जुजबी होते. जवळच्या ओळखीने त्यांना बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी मध्ये गाईड लेक्चररची नोकरी मिळाली, परंतु अलींना ते पुरेसे नव्हते. त्यावेळेस भारतात पक्षीशास्त्र हा विषय अस्तित्वातच नव्हता. यासाठी त्यांनी जर्मनीमध्ये जाऊन पक्षिशास्त्राचे प्रशिक्षण घेतले व काही काळ इंग्लंडमध्ये काम केले.

भारतात आल्यानंतर या विषयात नोकरी मिळणे कठीण काम होते. सलीम अली अजूनही हौशी पक्षी निरीक्षकांसारखेच गणले जात. आर्थिक परिस्थिती खालावल्याने त्यांनी आपल्या पत्नीच्या मदतीने अलिबागजवळ किहीमजवळ आपला मुक्काम हलवला. या मुक्कामात त्यांनी सुगरण पक्ष्याच्या वर्तनावर अतिशय बारकाईने अभ्यास केला व त्यावर 'बीएन्एच्एस'च्या जर्नलमध्ये त्यांनी प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला. हा निंबध त्यांना पक्षीशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळवून देण्यास जबाबदार ठरला. त्यांनी पक्ष्यांना केवळ टिपून त्यात भुसा भरून संग्रहालयात ठेवण्यासाठी पक्षिशास्त्र नाही हे जगाला दाखवून दिले व एकूणच पक्षीशास्त्रालाच वेगळी दिशा दिली.

यानंतर १९३० च्या सुरुवातीला सलीम अलींना ब्रिटिश सरकारपुरस्कृत तसेच संस्थाने पुरस्कृत पक्षी मोहिमांवर बोलवणे येऊ लागली. अलींनी या मोहिमांवर आपण नोंदी तसेच पक्ष्यांचा जीवनशैलींवर अभ्यास करणार असल्याचे स्पष्ट केले, केवळ पक्षी टिपून नोंदी ठेवण्यात आपल्याला रस नाही, ते काम कोणीही स्थानिक कामगार करू शकेल असे स्पष्ट केले. आता सलीम अली सर्वमान्य पक्षी शास्त्रज्ञ झाल्यामुळे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मंजूरी दिली व सलीम अलींचे पक्ष्यांचे खरेखुरे काम सुरू झाले. या नंतरच्या काळात भारताच्या मोठ्या भूभागावर त्यांनी पक्षी निरीक्षण मोहिमा आखल्या. देशाच्या वायव्य सरहद्दीपासून ते केरळच्या जंगलांपर्यंत तसेच कच्छच्या दलदलीपासून पूर्वेकडे सिक्कीम व अरुणाचलपर्यंत जाऊन त्यांनी पक्ष्यांच्या नोंदी केल्या. पक्ष्यांचे वर्तन, त्याच्यांत हवामानानुसार होणारे बदल, स्थलांतराच्या सवयी, विणीचे हंगाम यावर मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा केली. सुरुवातीला या कामी त्यांची पत्नी तेहमिनाने खूप मदत केली. त्याच सलीम अलींच्या मोहिमांचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट बघत. १९३९ मध्ये तेहमिनांचा मृत्यू झाल्यानंतर अली खूपच व्यथित झाले. त्यांच्या आयुष्यात खूप मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु त्यातून सावरून पुन्हा लग्न न करता त्यांनी आपले आयुष्य पूर्णपणे पक्ष्यांना वाहून देण्याचे ठरवले. आपला मुक्काम मुंबईला बहिणीच्या घरी हलवला व तेथूनच आपले उर्वरित आयुष्य घालवून भारतीय पक्षिशास्त्रासाठी अजरामर ठेवा निर्माण केला.सलीम अलींचे पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मोठेपण कशात आहे तर त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके. भारतभर फिरून त्यांनी जी तपशीलवार माहिती गोळा केली होती, त्याचे त्यांनी केवळ रेकॉर्ड्सर्मध्ये स्थान न ठेवता ती माहिती सर्वसामान्यांना वापरता येईल अश्या शैलीत पुस्तके लिहिली. सुरुवातीच्या काळात त्यांचे लिखाण सुधारण्यातही त्यांना तेहमिनांनी मदत केली होती. १९४३ मध्ये लिहिलेले द बुक ऑफ इंडियन बर्ड्स हे पुस्तक आजही पक्षी ओळखण्यासाठी पहिल्या पसंतीचे आहे आज हे पुस्तक १३ व्या आवृतीत असून पुस्तकातील पक्ष्यांची फारच थोडी चित्रे बदलण्यात आली आहेत. यावरून त्यांनी केलेल्या सूक्ष्म निरीक्षणांची अचूकता लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ बर्ड्स ऑफ इंडिया अँड पाकिस्तान (पिक्टोरियल गाईड) या दहा खंडी पुस्तकाने त्यांना खऱ्या अर्थाने अजरामर केले. डॉ. सिडने डिलन रिप्ली यांच्या साथीदारीत त्यांनी अपार परिश्रम घेऊन भारतीय पक्ष्यांच्या १२०० जातींच्या व २१०० उपजातींच्या नोंदी, त्यांच्या सवयी वगैरे सर्वांगीण शास्त्रशुद्ध माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध केली.

१९५० व ६० च्या दशकात जेव्हा भारतात पर्यावरण हा शब्द अस्तित्वातच नव्हता त्यावेळेस भरतपूरच्या केवलदेव घाना राष्ट्रीय उद्यान तसेच केरळमधील सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानात तत्कालिन होणारे पर्यावरणास हानीकारक प्रकल्पांना विरोध दर्शावला. त्यांचे वाक्य तत्कालीन पंतप्रधान चरणसिंग यांना चांगलेच झोंबले होते. ताजमहाल नष्ट झाला तर पुन्हा बांधता येईल परंतु सायलंट व्हली सारखे जंगल एकदा नष्ट झाल्यावर पुन्हा उभारता येणार नाही. त्यांनी केलेल्या शास्त्रीय वादावर सरकारने नमते घेउन इंदिरा गांधी सरकारने हे प्रकल्प स्थगित केले तसेच अंततः त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा देउन कायमचे संरक्षित केले. तसेच अनेक दुर्मिळ प्राणी व पक्षी यांबाबत आपल्या पुस्तकांद्वारे, संस्थेद्वारे, शिष्यांमार्फत केलेले सरकार तसेच सामान्य नागरिकांमध्ये केलेले प्रबोधन भारतातील पर्यावरण चळवळीचा पाया ठरले. त्यामुळेच भारतातील आद्य पर्यावरणवाद्यांमध्ये डॉ. सलीम अली यांचा समावेश होतो. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त सर्वांना राष्ट्रीय पक्षी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**-प्रविण बागडे,नागपूर**

# बेरोजगारी घटली, आता रोजगार वाढ हवी

महाराष्ट्रात अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना अगोदरच जाहीर करण्यात आली असून त्यासाठी ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या योजनेचे ठिकठिकाणी कार्यक्रमही घेतले जात आहेत. लाडक्या बहिणींप्रमाणे लाडक्या भावांसाठी आम्ही बरेच काही करत आहोत, असा दावा महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारने केला आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत ही योजना राबवली जात आहे. उमेदवार हा १८ ते ३५ वयोगटातील असावा, अशी गट आहे. अशा उमेदवारांना सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी मिळेल. दर वर्षी कार्य प्रशिक्षणाच्या दहा लाख संधी मिळणार आहेत. बारावी उत्तीर्ण असलेल्यांसाठी सहा हजार रुपये महिना, आयटीआय आणि पदविका उत्तीर्ण असलेल्यांकरिता आठ हजार रुपये तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण उत्तीर्ण असलेल्यांसाठी दहा हजार रुपये दिले जातील. या प्रकारे उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार केले जाणार आहे. इच्छुक उमेदवार आणि आस्थापनांनी त्यासाठी सरकारकडे ऑनलाइन नोंदणी करणे अपेक्षित आहे. देशात आणि राज्यात बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड असून त्यामुळे या प्रकारच्या योजनांची आवश्यकता असल्याचे कोणीही नाकारणार नाही.



चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर ७.२ टक्के असेल अशी अपेक्षा आहे. आगामी काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेची गती अशीच कायम राहील, अशी आशा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केली आहे; परंतु भारतात असंख्य तरुण-तरुणींनी उत्तम शिक्षण घेतलेले असून देखील नोकरी मिळत नाही. मुख्य म्हणजे क्वालिटी जॉब्स किंवा काही एक गुणवत्ता आणि कौशल्य आवश्यक असणाऱ्या नोकऱ्या कमी आहेत. नुकताच पीरिऑडिक लेबर फोर्स सर्वे प्रसिद्ध झाला असून त्यामधून या प्रश्नावर प्रकाश पडला आहे. समग्र पातळीवर विचार केला असता लक्षात येते की २०१७-१८ मध्ये लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट म्हणजेच काम मिळण्याचे ४९ टक्के इतके प्रमाण २०२३-२४ पर्यंत ६० टक्क्यांवर आले आहे. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे; परंतु एवढी वाढ होण्याचे कारण काय? तर शहरांमध्ये आणि मुख्य म्हणजे ग्रामीण भागात कामामधील महिलांच्या सहभागाचे प्रमाण २४ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांवर गेले आहे. स्त्रियांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढत असल्यास ही स्वागताचीच बाब आहे; परंतु थोडे खोलात गेल्यास लक्षात येईल की, लाखो कुटुंबांची अवस्था इतकी बिकट असते की, घरउत्पन्नात हातभार लावण्यासाठी या स्त्रियांना घरकाम करून, शिवाय छोटी-छोटी कामेही करावी लागत आहेत. अन्यथा, त्यांची गुजराण होणे अशक्य. यापैकी बहुतेक महिला स्वयंरोजगार क्षेत्रातच आहेत.

गेल्या सहा वर्षांमध्ये स्वयंरोजगार करून पोट भरणाऱ्या महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांवरून ६७ टक्क्यांवर गेले आहे. यापैकी काही महिला या स्टॉलवर बसून विक्री करतात किंवा हातगाड्यांवर भाजी वगैरे विकतात. अशाच प्रकारे अन्य लहान-सहान कामे करतात. काही महिला आपल्याच मुलाच्या अथवा नवऱ्याच्या दुकानात हातभार लावण्यासाठी बसतात किंवा स्वतःच्या छोट्या शेतात काम करतात. त्यासाठी त्यांना कोणताही पगार मिळत नाही. दुसरे म्हणजे, मोठ्या प्रमाणातील मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे आहेत. २०२३-२४ मध्ये प्रोप्रायटरी किंवा पार्टनरशिपमधील छोट्या, छोट्या व्यवसाय-उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची संख्या एकूण संख्येच्या ७३ टक्के इतकी होती. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ६८ टक्के इतके होते. शिवाय उत्पादन क्षेत्रातील रोजगार वाढलेला नाही. तो कुंठितावस्थेत आहे. उलट, कृषी क्षेत्रातील रोजगार हळूहळू वाढत आहे.

कृषी क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न कमी आणि तरीही तिथेच अधिकाधिक प्रमाणात रोजगार वाढत असल्यास, ती चिंतेची बाब मानावी लागेल. कृषीक्षेत्रात सहा वर्षांपूर्वी ४४ टक्के लोक काम करत होते. आता हे प्रमाण ४६ टक्क्यांवर गेले आहे, तर कारखानदारी किंवा उत्पादन क्षेत्रातील २०२१-२२ मधील ११.६ टक्के रोजगार २०२३-२४ मध्ये ११.४ टक्क्यांवर आला आहे. देशातील बेरोजगारीचे प्रमाण २०१७-१८ मध्ये सहा टक्के होते. ते आता ३.२ टक्क्यांवर आले आहे, ही चांगली बाब आहे. तसेच युवकांमधील बेरोजगारीचे प्रमाण याच काळात १७ टक्क्यांवरून दहा टक्क्यांवर आले आहे. तरीदेखील दहा टक्के हे प्रमाणही जास्तच आहे. शिवाय उच्च शिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाण खूप आहे. भारतात अधिकाधिक उत्पादक स्वरूपाच्या, गुणवत्तापूर्ण आणि चांगले वेतन देणाऱ्या रोजगारांच्या संधींची आवश्यकता आहे. भांडवलसघन, स्वयंचलित उत्पादनपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर यामुळे रोजगारनिर्मितीचे मोठे आव्हान देशासमोर आहे. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या स्वतंत्र 'थिंक टँक'च्या आकडेवारीनुसार जून २०२४ मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ९.२ टक्के होता, मे २०२४ मधील सात टक्क्यांवरून त्यात वाढ झाली आहे. 'सीएमआयई'चा कंझ्युमर पिरॅमिड्स हाऊसहोल्ड सर्व्हे दर्शवतो की जून २०२४ मध्ये महिला बेरोजगारी १८.५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे, जी राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. मागील वर्षी याच कालावधीतील १५.१ टक्क्यांपेक्षा ही वाढ जास्त आहे. त्याच वेळी, पुरुष बेरोजगारी ७.८ टक्के होती. जून २०२३ मधील ७.७ टक्क्यांपेक्षा ती किंचित जास्त आहे. कामगार सहभाग दर (एलपीआर) जून २०२४ मध्ये ४१.४ टक्क्यांपर्यंत वाढला. जून २०२३ मध्ये तो ३९.९ टक्के होता. ग्रामीण बेरोजगारीचा दर मे महिन्यातील ६.३ टक्क्यांवरून जूनमध्ये ९.३ टक्के झाला. शहरी बेरोजगारीचा दर ८.६ टक्क्यांवरून ८.९ टक्क्यांवर पोहोचला आहे. 'एलपीआर'हे काम करणाऱ्या किंवा काम करण्यास इच्छुक असलेल्या आणि एकूण काम करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येमध्ये लोकांपासून बनलेले असते. कामगारांची मागणी आणि रोजगार दरांमधील या बदलत्या कलांमुळे प्रचलित आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे. हे प्रमाण रोजगाराच्या जास्त संधी निर्माण करण्यासाठी आणि देशाची आर्थिक लवचिकता वाढवण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता आणण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

आजच्या जागतिक स्पर्धेत देशाचे अस्तित्व टिकवायचे असेल आणि अर्थव्यवस्थेचा पाया अधिक रुंद आणि खोल करायचा असेल, तर फक्त सरकारी भांडवलावर अवलंबून राहता येत नाही. म्हणून सरकारी उद्योगांचे खासगीकरण आणि खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे होते आणि आजची ती गरज आहे. सार्वजनिक क्षेत्रात एखादा उद्योग करण्यासाठी शंभर माणसांना रोजगार दिला जात असेल आणि तेच काम खासगी क्षेत्राकडे देण्यात आल्यास फार कमी माणसांमध्ये केले जाते. कामाचा दर्जाही अधिक चांगला असतो आणि अधिक कामही केले जाते; पण यामुळे काही जणांचा रोजगार मात्र जातो हे सत्य आहे. यांत्रिकीकरण ही फक्त भांडवलशहांची नव्हे, तर काळाची गरज आहे. जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर वस्तू आणि सेवांचा दर्जा फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे आजच्या जगात यांत्रिकीकरणाला पर्याय नाही; परंतु एक स्वयंचलित यंत्र आणले जाते, तेव्हा अनेक माणसांचा रोजगार जातो. यंत्र चालवण्यासाठी आवश्यक ते शिक्षण आणि कौशल्य असलेल्यांना नोकरी मिळते; पण शिक्षण किंवा कौशल्य नसणाऱ्यांचा रोजगार जातो. त्यांच्यासाठी नव्याने रोजगार निर्माण होण्याचे प्रमाण कमी होते किंवा त्यांना अपेक्षित रोजगार मिळत नाही. आता तरुणांच्या हाताला काम नाही आणि उद्योगपती म्हणतात, त्यांना अपेक्षित मनुष्यबळ मिळत नाही. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी खऱ्या असतील, तर त्याचा सोपा अर्थ आहे की तरुणांनी फक्त पदव्यांचे कागद मिळवले आहेत आणि खऱ्या अर्थाने रोजगाराभिमुख शिक्षण घेतलेले नाही. शिक्षण प्रक्रियेतील ही त्रुटी दूर करण्याचे आव्हान देशासमोर आहे.

# प्रवाशांना वाली कोण?

मुंबई लोकल म्हणजे चाकरमान्यांची लाईफलाईन. पण ही लाईफलाईन कधी आणि कशाने बंद पडेल आणि कोणत्या गोष्टींनी विस्कळीत होईल याची काहीही खात्री कुणीही देऊ शकत नाही. शुक्रवारी रात्री मुंबईची लाईफलाईन टिटवाळा येथून निघाली होती आणि तिचे डबे रूळांवरून घसरल्याची माहिती मिळाली. पण रेल्वे प्रशासनाने काहीही माहीती देण्याची तसदी घेतली नाही आणि गोंधळ हा सुरूच राहिला. कल्याण रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर ही घटना घडली आणि लाखो प्रवाशांना प्रचंड मनःस्ताप सुरू झाला. लोकल वाहतुकीवर या अपघाताचा परिणाम झाला हे सांगण्याची काहीच गरज नाही. रात्री अपघात झाला आणि दुसऱ्या दिवशी त्याचे परिणाम दिसून आले. शनिवारी पहाटेपासूनच मुंबईकडे जाणाऱ्या लोकल पाच ते दहा मिनिटे उशिराने धावत होत्या. कल्याणजवळ लोकलचे डबे घसरून हा अपघात घडला आणि त्याचे कवित्व सुरू झाले ते प्रवाशांच्या हालांचे. या घटनेमुळे अप आणि डाऊन गाड्यांवर विपरीत परिणाम झाला आणि प्रवासी आपापल्या कामाच्या ठिकाणी वेळेवर पोहोचू शकले नाहीत. पण त्यांना झालेला मनस्ताप हा त्यापेक्षा कितीतरी जास्त होता. दिवा- डोंबिवली दरम्यान गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. रेल्वे प्रवाशांना कुणीच वाली नाही हे याचे कारण आहे. रेल्वे मंत्री येतात आणि दोन दिवस चमकोगिरी करून निघून जातात.



प्रवाशांचे अशा परिस्थितीत काय हाल होतात याचे त्यांना काहीही सोयरसुतक नसते आणि त्यांच्यापर्यंत ती बाब पोहोचतही नाही. नेहमीच अशा घटना होत असतात आणि पुढे काहीच झाले नाही अशा थाटात सर्वजण सारे ती परिस्थिती विसरून जातात. कारण तितका वेळच कुणाकडे नसतो. यापूर्वी अशा कितीतरी घटना घडल्या आहेत आणि चार दोन दिवसांच्या थातूरमातूर उपाययोजनेनंतर प्रवासी आणि रेल्वे प्रशासनही ती बाब विसरून गेले आहेत. परवाच्या प्रकारानंतर लोकल तीन तासांच्या विलंबानंतर सुरू झाल्या. त्यावेळी गर्दी किती असते याची कल्पनाही न केलेली बरी. अक्षरशः लोक एकमेकांच्या अंगाला लटकून प्रवास करत होते. एरवीच ते अशीच झोंबाझोंबी करत असतात. कोणत्याही रेल्वे लाईनवर हीच परिस्थिती आहे. मग ती हार्बर लाईन असो, पश्चिम रेल्वे असो की विरार ते चर्चगेट लाईन असो. या स्थितीत प्रवाशांच्या हालांना पारवार राहत नाही. यावर उपाय आहेत का, तर ते आहेत; परंतु त्यासाठी रेल्वे प्रशासनाची तयारी हवी. रेल्वे मंत्रालय स्वतंत्र आहे पण त्याचा काहीही उपयोग नाही. रेल्वे अर्थसंकल्प पूर्वी स्वतंत्र सादर केला जायचा आणि त्यासाठी तारीखही २८ फेब्रुवारी ही ठरवून दिलेली असायची. पण नंतरच्या सरकारच्या काळात ती प्रथा रद्द झाली. नवीन बदल घडलेच पाहिजेत त्यामुळे या बद्दल काही नाही. पण नवीन प्रथा सुरू केली, तर ती लोकांच्या कितपत उपयोगी पडली पाहिजे याचाही विचार केला पाहिजे. वास्तविक मुंबई रेल्वे लोकल सेवा ही देशाच्या दृष्टीने आदर्श आहे. कोणत्याही शहरात असे जाळे नाही जे मुंबईत आहे. पण मुंबईची वाहतूक व्यवस्था आणि मुंबईची लोकल सेवा यामुळे नेहमीच असे प्रकार घडतात ज्यांचे परिणाम साऱ्या राज्याला भोगावे लागतात. मुख्यतः मुंबईकर प्रवाशांना त्याचे परिणाम भोगावे लागतात आणि ही बाब जास्त महत्त्वाची आहे. मुंबईचे लोकल सेवेचे नेटवर्क जबरदस्त आहे आणि ते यांत्रिकी पद्धतीने चालवले जाते. आजपर्यंत त्यात मोठा अडथळा आलेला नाही. पण लहान-लहान अडथळे रोजच येत असतात आणि त्याचे परिणाम मुंबईकर जनतेला भोगावे लागतात.

वास्तविक देशाला अनेक रेल्वेमंत्री लाभले आहेत. पण रेल्वेमंत्री आपल्या भागातून जास्तीत जास्त रेल्वे सेवा सुरू कशी करता येईल याचीच व्यवस्था करण्यात गुंतलेला असतो. त्यामुळे त्यातून लोकल प्रवाशांचे हाल हे रोजच ठरलेले असतात. दिनेश त्रिवेदी किंवा ममता बॅनर्जी असोत, या रेल्वे मंत्री असताना त्यांच्या भागातून म्हणजे बंगालमधून मुंबईकडे जास्तीत जास्त संख्येने लोक कसे येतील याची सोय करण्यात आली होती. त्यासाठी जास्तीत जास्त गाड्या त्या भागातून सुरू करण्यात आल्या. पण मुंबईकरांची चांगल्या वाहतुकीची सोय त्यात पाहिली गेली नाही आणि मुंबईला तिचा हक्क डावलून केवळ रेल्वेची तिजोरी भरण्यात त्याचा उपयोग केला गेला. एखादी लोकल बंद केल्यानंतर नंतर आलेल्या ट्रेनला झालेली गर्दी पाहिली की जीव गुदमरतो. पण मुंबईकरांचा इलाज नाही कारण त्यांना याच लोकलने प्रवास करायचा असतो कारण त्यांची कच्चीबच्ची घरी वाट पाहत असतात. त्यात लोकलला उशीर झाला की मग घरची परिस्थिती अत्यंत वाईट असते. रेल्वे प्रशासनच याला जबाबदार आहे. प्रवाशांची संख्या अफाट आहे यात काही शंका नाही. पण रेल्वे प्रशासन त्यावर काही उपाय योजत नाही हे त्याचे खरे कारण आहे. मध्यंतरी मेट्रो मुंबईचा प्रकल्प ठाकरे सरकारने बारगळवला. हा प्रकल्प सुरू झाला असता, तर मुंबईकरांचे सुखात प्रवास करण्याचे स्वप्न तरी प्रत्यक्षात आले असते. पण ठाकरे सरकारला मुंबईकरांच्या हालांचे काहीही पडलेली नाही. नंतर शिंदे सरकारने तो प्रकल्प तावडीतून सोडवला. पण मुंबईच्या लोकल प्रवाशांचे हाल अतोनात होत असताना सरकार जर लोकविरोधी असले तर त्यांचे कसे हाल होतात याचे विदारक दर्शन या घटनेने घडले. परवाची मुंबईची लोकल स्थानकातील घटना अशीच आहे. तिला किरकोळ म्हणून झटकता येणार नाही. यावर कायमस्वरूपी उपाय हवा आणि सरकार लोकांच्या बाजूने विचार करणारे हवे. अन्यथा प्रवासी तसेच हालात प्रवास करत राहतील. कित्येक वेळा प्रवासी रेल्वे ट्रॅकवर उतरून आंदोलन केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. हे सर्व पाहिले की ब्रिटिशांनी सुरू केलेली ही रेल्वे व्यवस्था सांभाळण्यास आपण लायक आहोत की नाही याचा प्रश्न पडतो.

# महिलांच्या बँक खात्यात आमचे सरकार प्रति महिना ३०००/रू जमा करणार : हर्षवर्धन पाटील

## महिलांना मोफत एसटी प्रवास;१८ वर्षे पूर्ण झालेवर मुलीस देणार रु.१लाख

## महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**





राज्यात निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे. आमचे सरकार सत्तेवर आलेनंतर महालक्ष्मी योजना सुरु करून महिलांच्या बँक खात्यात प्रति महिना रु.३०००/रू. प्रमाणे रक्कम जमा करणार आहे. तसेच महिलांना मोफत एसटी प्रवास,मुलींना १८ वर्षे पूर्ण झालेवर रु.१ लाख रक्कम व महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर देण्याचे जाहीरनाम्यात जाहीर केले आहे. आमचे महाविकास आघाडी सरकार हे महिला भगिनींचे सरकार असणार आहे, असे स्पष्ट प्रतिपादन इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी मंगळवारी (दि.१२) सुरवड,पिंपरी बु.लाखेवाडी, निरवांगी,वरकुटे खु.या गावांचा झंझावती प्रचार दौरा केला.या दौऱ्यात सुरवड (ता. इंदापूर) येथील सभेत हर्षवर्धन पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारने जाहीर केलेल्या जाहीरनाम्याची माहिती दिली. हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, शेतकऱ्यांचे रु.३ लाख पर्यंतचे कर्ज माफ केले जाईल तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपुर अनुदान देण्यात येणार आहे. दुधाच्या उत्पादन खर्चानुसार प्रत्येक वर्षी दुधाला दर दिला जाईल. तसेच प्रत्येक कुटुंबाला रु. २५ लाखाचा आरोग्य विमा देणार आहोत. शिवाय सुशिक्षित बेरोजगार युवकांना दरमहा ४ हजार रुपयांची मदत केली जाईल, आदी जाहीरनाम्यातील लोकहिताच्या तरतुदींची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली. हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इंदापूरच्या विद्यमान आमदारांना शरद पवारांनी आजपर्यंत २५ वर्षात भरभरून पदे दिली. तरीही त्यांनी ८४ वर्षीय पवार साहेबांच्या विरोधात जाऊन गद्दारी केली आहे. तसेच दुसऱ्या उमेदवारालाही शरद पवारांनी उद्योग धंदे उभारणीसाठी परवाने, सवलती, अनुदान आदी विविध प्रकारे मोठे सहकार्य केले आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत आदरणीय पवार साहेबांना दोन्ही उमेदवारांनी विरोध केल्याने मतदारांनी त्यांना जागा दाखवून द्यावी, असे आवाहन हर्षवर्धन पाटील यांनी केले.

अनेक जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात गेल्या २ दिवसात प्रवेश केला आहे. सन १९५२ पासून शंकररावजी पाटील (भाऊ) च्या शिकवणीनुसार सर्व जाती-धर्मांना बरोबर घेऊन आंम्ही काम करीत आहोत. इंदापूर तालुक्याचा आंम्ही सत्तेवर असताना २० वर्षांमध्ये केलेला सर्वांगीण विकास जनतेला माहित आहे,असेही हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात नमूद केले. यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड. तेजसिंह पाटील,शिवसेने (उबाठा) चे नितीन शिंदे,उदयसिंह पाटील,शिवाजी हांगे,बळीराम शिंदे,संजय कांबळे,शंकर शिंदे,संजय शिंदे,निलेश जगताप,अरुण पवार,प्रीतम देवकर,दादा तोबरे,ओंकार नलावडे,यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुरेश मेहरे यांनी केले.यावेळी पक्षाचे कार्याध्यक्ष महारुद्र पाटील, विलासबापू वाघमोडे,अमोल भिसे, काँग्रेस पक्षाचे काका देवकर आदींसह पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन सूर्यकांत फडतरे यांनी केले.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन भाऊ पाटील यांना विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड बहुमताने निवडून आणायचे आहे, या ईर्षेने सुरवड, वकीलवस्ती, शेटफळ हवेली, भोडणी, पंधरवाडी, वडापुरी गावातील युवक वर्ग कामाला लागल्याचे चित्र या कार्यकर्ता बैठकीमध्ये दिसून आले. हर्षवर्धन पाटील यांचे बद्दल युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य दिसून येत आहे.

---

### नांदेड शहराला प्रशासनाने घातली साद यावेळी करा रेकॉर्डब्रेक मतदान

# महावीर चौकातून मतदान वाढविण्याचे आवाहन स्वीप अंतर्गत निरीक्षकासह अधिकारी सहभागी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**



नांदेड जिल्ह्यामध्ये गेल्या लोकसभा निवडणुकीत केवळ ६१ टक्के मतदान झाले होते. यावेळी ही टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढली पाहीजे यासाठी प्रशासन जोमाने कामाला लागले असून सर्वच स्तरातून प्रशासनाला प्रतिसाद मिळत आहे. आज महावीर चौकातील स्वीप अंतर्गत जाहीर कार्यक्रमामध्ये निवडणूक निरीक्षकांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. नांदेडकरांनी लोकशाहीच्या या पर्वात आपली जबाबदारी बहुसंख्येने पूर्ण करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

दि. ११ नोव्हेंबर रोजी ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदान जनजागृती विशेष अभियान राबविण्यासाठी महावीर चौकात मनोरंजनासह प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी निवडणूक निरीक्षक श्रीमती बी. बालामाया देवी, श्रीमती पल्लवी आकृती, कालुराम रावत , शैलेंद्र कुमार, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, नांदेड वाघाळा शहर महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, श्रीमती अनुष्का शर्मा, मनपा अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, मनपा उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त संजय जाधव, सुप्रिया टवलारे, सहायक आयुक्त मिर्झा बेग, गुलाम सादिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी उपस्थित सर्व नागरिकांना निष्पक्षपणे व कुठल्याही प्रलोभणाला बळी न पडता मतदान करण्याची शपथ दिली. याप्रसंगी भोकर येथील स्वीप कक्षाचे अधिकारी श्रीमती सुमन गोणारकर आणि सुधांशु कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार राजा आता तरी तू जागा हो! कणखर लोकशाहीचा तू मजबूत धागा हो! या आशयाचे पथनाट्याचे सादरीकरण करीत मतदार राजाला मतदान करण्याचे राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

सादर करते समूहामध्ये सरस्वती कारले, सरस्वती जाधव, ज्योती पाटेकर, रूपाली कांबळे अनघा नरवाडे, वर्षा ढवळे, रेखा कांगठीकार, मनोरमा गोवंदे, रामेश्वर शिंदे, राजू सोनकांबळे, रंगराव कासराळे, प्रमोद फुलारी, गुलाब पावडे, साहेबराव डोंगरे यांचा समावेश होता.या मतदारसंघातील कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते केंद्र सरकारकडून आलेल्या केंद्रिय सुचना कार्यालयाच्या क्षेत्रीय प्रचार कार्यालयामार्फत जिल्ह्यात सुरु झालेल्या चलचित्र रथाचे उद्घाटन करण्यात आले. या रथाद्वारे मतदार संघातील शहरी आणि ग्रामीण भागात मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. जेणेकरून जास्तीत जास्त मतदान होऊन लोकशाही बळकट होईल. यानिमित्त स्वीप कक्षाद्वारे सेल्फी पॉईंट उभा करण्यात आला होता यामध्ये महाविद्यालयातील तरुण मतदारांनी आणि इतर सामान्य नागरिकांनी सेल्फी काढून आपला सहभाग नोंदवला.

**प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रापर्यंत पोहोचा**

लोकशाहीमध्ये प्रत्येक मताला महत्व आहे. आपला देश या लोकशाहीच्या आधारावर चालतो. पण मतदार राजा मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी थोडा निष्काळजी करतो. यावेळी आपल्या सर्वांना मिळून जास्तीत-जास्त मतदान करायचे आहे. काश्मीरसारख्या दुर्गम भागात आपल्यापेक्षा अधिक मतदान होते. यावेळी प्रत्येक नांदेडकरांनी मतदान करावे. आपले प्रत्येक मत हे आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे मत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी व्यक्त केले.

---

## १४ नोव्हेंबरपासून शहरात डॉक्टरांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने १४ ते १७ नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा स्पर्धा आयएमएच्या दिल्ली येथील मुख्यालयाच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी देशभरातून जवळपास हजारांहून अधिक अलिओपॅथिक डॉक्टर खेळाडू शहरात दाखल होणार आहेत, अशी माहिती सोमवारी, ११ रोजी येथे विशेष पत्रपरिषदेत देण्यात आली.या स्पर्धांमध्ये १३ खेळांचा समावेश करण्यात आलेला आहे, यामध्ये पुरुष क्रिकेट, महिला क्रिकेट, बॅडमिंटन, बास्केटबॉल, लॉन टेनिस, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, जलतरण स्पर्धा, वॉकथॉन, मॅरेथॉन, सायक्लोथॉन, थलेटिक्स आदी खेळ घेण्यात येणार आहेत. यासाठी शहरातील विविध मैदाने सज्ज करण्यात आलेली आहे. विभागीय क्रीडा संकुल, गरवारे क्रिकेट मैदान, एडीसीए एन-२, सिडको क्रिकेट मैदान, इंड्यूरन्स ग्राउंड, बॅक वूड अरेना टर्फ या ठिकाणी या स्पर्धा होणार आहेत.स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना वेलकम किट, सहभाग प्रमाणपत्र , एमएमसी ६ क्रेडिट पॉईंट दिले जातील, तर विजेत्या खेळाडूंना सन्मान पदक देऊन गौरविण्यात येणार आहे. येणाऱ्या खेळाडूंच्या भोजनाची व्यवस्था आयएमए कडून करण्यात आली आहे.याच वेळी तीन दिवसीय स्पोर्ट्स मेडिसिन परिषदेचेही आयोजनही १४ ते १६ नोव्हेंबरला होणार आहे. यात शहरासह महाराष्ट्र तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ डॉक्टर विविध खेळांमध्ये घ्यावयाची काळजी, समस्या, निदान व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, एमजीएम मेडिकल कॉलेज, रामचंद्र इन्स्टिट्यूट, सीएसएमएस मेडिकल कॉलेज आणि बदनापूर मेडिकल कॉलेजचे यासाठी सहकार्य लाभणार आहे.या स्पर्धेचे उद्घाटन १५ नोव्हेंबर रोजी सायेकाळी ५ वाजता होणार आहे. आयएमएचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. अशोकन, सचिव डॉ.अनिलकुमार नायक, माजी अध्यक्ष डॉ. शरदकुमार अग्रवाल, आयएमए महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम, सचिव डॉ. अनिल आव्हाड आदींच्या उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या अध्यक्षा डॉ. उज्वला दहिफळे, सचिव डॉ. विकास देशमुख , डॉ. प्रफुल्ल जटाळे आदी यासाठी परिश्रम घेत आहेत.



**दि. १३ रोजी बुलढाणा जिल्हा न्यायालयात फुले शाहू आंबेडकर चळवळीतील मान्यवरांची चाय पे चर्चा. उपस्थित ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे साहेब चिखली, कलाकार बबनराव महामूने, दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत, सिंदखेड राजा मिरर चे संपादक राहुल झोटे,साप्ताहिक भागीदार चे संपादक भास्कर इंगळे, व इतर मान्यवर उपस्थित होते. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क बुलढाणा)**

---

# सिंदखेड राजा येथील मतदान यंत्र सिलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेड राजा २४ विधानसभा मतदासंघात निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १२ नोव्हेंबर आणि १३ नोव्हेंबर २०२४ रोजी ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करण्याचे काम आज संपन्न झाले.

२४ सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने सिंदखेड राजा मतदारसंघांमध्ये एकूण ३४० मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ३४० मतदान यंत्र (उण) सिलिंग करण्यात आले, ३४० मतदान केंद्राकरिता एकूण ६८० बॅलेट युनिट (इण) सिलिंग करण्यात आले तसेच ३४० व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करून सज्ज करण्यात आले.

त्याचप्रमाणे प्रत्यक्ष मतदानादिवशी काही अडचण उद्भवल्यास राखीव मध्ये ६५ मतदान यंत्र (उण), १३० बॅलेट युनिट (इण), ६५ व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करून सज्ज करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे एकूण मतदान यंत्रापैकी २० मतदान यंत्रावर प्रारूप स्वरूपात १००० प्रमाणे मतदान नोंदवून मतदान यंत्र सुस्थितीत असून मतदान प्रक्रियेसाठी सज्ज असल्याची खातरजमा करण्यात आली. सर्वच मतदान यंत्रावरती प्रारूप मतदान घेतल्यानंतर ते सुस्थितीत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतरच मतदान यंत्र सिलिंग करण्यात आले आहे. विधानसभा निवडणूक २०२४ साठी सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये एकूण ३४० मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ३० सिलिंग टीम पुढील २ दिवस म्हणजेच १२ नोव्हेंबर आणि १३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण करणार आहेत. प्रत्येक टीम मध्ये एक झोनल अधिकारी, एक सहाय्यक झोनल अधिकारी, एक ग्राम महसूल अधिकारी, एक महसूल सेवक असे एकूण ४ कर्मचारी -अधिकारी काम करत आहेत त्यातील टीम क्रमांक १४ मध्ये झोनल अधिकारी विजय माईनकर , सहायक झोनल अधिकारी श्रीकांत बुलबुले , ग्राम महसूल अधिकारी विष्णू थोरात , आकाश माघाडे महसूल सहायक हे चार अधिकारी कर्मचारी काम करत आहेत. कालपासून सुरु असलेल्या या ई.व्ही.एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीनचे सिलिंगचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी मा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीम युद्धपातळीवर काम करत आहे आणि ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट सिलिंग ची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मेहनत घेत आहेत . त्यासाठी मा. तहसीलदार सिंदखेडराजा श्री. अजित दिवटे , मा. तहसीलदार देऊळगाव राजा श्रीमती वैशाली डोंगरजाळ, मा. गट विकास अधिकारी सिंदखेड राजा श्री मुकेश माहोर ,मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा श्री प्रशांत व्हटकर, मा. निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री. मनोज सातव,मा.निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा श्री प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ.अस्मा मुजावर ,मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ. प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, मा.प्र. नायब तहसीलदार श्री. नितीन बढे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी श्री. अंकुश म्हस्के, नोडल अधिकारी श्री सचिन पांचाळ तसेच सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग यांनी सिलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न करत आहे .




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904

## संपादकीय..

# एक ना धड, भाराभर चिंध्या!



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई) संलग्न असलेल्या शाळांच्या धर्तीवर राज्य मंडळांना (एसएससी) जोडलेल्या शाळाही एक एप्रिलपासून सुरू करण्याची राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील सूचना म्हणजे शिक्षणाच्या केंद्रीकरणाच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल म्हणावे लागेल. 'सीबीएसई'च्या शाळा देशभर विखुरल्या असून, तेथील शैक्षणिक वर्ष एप्रिलला सुरू होते आणि मार्चला संपते. राज्य मंडळांच्या शाळा जूनमध्ये सुरू होतात आणि एप्रिलला संपतात.

गेल्या काही वर्षांपासून 'सीबीएसई'चा प्रभाव वाढला असून, त्याला संलग्न असणाऱ्या शाळांची संख्या वाढते आहे. मार्चच्या अखेरीस वार्षिक परीक्षा संपवून लगेचच एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याची आणि मे महिन्यात उन्हाळ्याची सुट्टी देण्याची तेथील पद्धत राज्यातही अंगवळणी पडत आहे. गणित आणि विज्ञान या विषयांसाठी 'सीबीएसई'चाच अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम घेण्यापासून तिसरीपासून हिंदीच्या सक्तीसह त्रिभाषा सूत्र राबविण्यापर्यंत राज्यातील शालेय शिक्षणाची पावले केंद्रीय मंडळाच्या अनुकरणाच्या दिशेने पडत आहेत.

नवे वेळापत्रकही या अनुकरणाचाच भाग म्हणता येईल. तथापि, ते राज्यातील विद्यार्थी, शिक्षक आणि सर्व संबंधित समाजघटक यांना सोयीचे आहे का हे पाहून निर्णय व्हायला हवा. मात्र, खरा प्रश्न आहे, तो राज्याच्या शैक्षणिक स्वायत्ततेचा. केंद्रीकरणाला पूरक भूमिका घेण्याच्या नादात महाराष्ट्र आपली शैक्षणिक स्वायत्तता गमावत आहे काय? 'तर्कसंगत विचार आणि स्वायत्तता' हे आपल्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक असल्याचे राज्य अभ्यासक्रम आराखड्याने म्हटले आहे; प्रत्यक्षात या दोन्ही गोष्टींना छेद देणारी कृती होते काय, याबाबत आराखडा तयार करणाऱ्या तज्ज्ञांनी अंतर्मुख व्हायला हवे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी २०२०) जाहीर झाल्यानंतरच्या गेल्या चार वर्षांपासून, आपल्याकडील सर्व शैक्षणिक समस्यांचे उत्तर या दस्तावेजात असल्याचे मानले जात आहे. बालशिक्षणापासून व्यावसायिक शिक्षणापर्यंत आणि मातृभाषेतील शिक्षणाला चालना देण्यापासून उच्च शिक्षणात लवचीकता आणण्यापर्यंतच्या तरतुदी या धोरणात असल्या, तरी त्यातील विचारसरणीपासून शिक्षणावरील खर्चापर्यंतच्या मुद्द्यांवर प्रश्नचिन्हेही उपस्थित केली जात आहेत. मात्र, त्यांना उत्तरे न देता धोरणाच्या अंमलबजावणीची घाई सुरू आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा हा या अंमलबजावणीचाच एक भाग. त्यामुळे त्यातील बहुतेक सूचना आणि तरतुदींच्या मुळाशी राष्ट्रीय शिक्षण धोरण आहे. परिणामी या धोरणातील दोष या आराखड्यातही उतरले आहेत.

देशातील विविध प्रकारच्या विविधतेचा गौरवाने उल्लेख करूनही केंद्रीकरणाचे सूत्र सध्या राबविले जात आहे. देशभरातील शिक्षण धोरणात आणि व्यवस्थेत व्यापक समानता असावी यात शंकाच नाही; परंतु त्यामुळे प्रादेशिक आणि स्थानिक मुद्दे गौण ठरणार नाहीत, हे पहायलाच हवे. जूनमध्ये सुरू होणाऱ्या शाळा एप्रिलमध्ये सुरू करण्याचे फायदे-तोटे विचारात घ्यायला हवेत. हीच गोष्ट तिसरीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याची. लहान वयात मुले भाषा लवकर शिकतात हे मान्य; परंतु मातृभाषा आणि परिसर भाषा या दोहोंखेरीज तिसरी कोणती भाषा त्यांनी शिकावी याची सक्ती का करायची, या प्रश्नाचे उत्तर मिळायला हवे.

मुलांच्या दप्तराचे ओझे खूप वाढत असल्याबद्दल आपल्याकडे अनेकदा अश्रू ढाळले जातात. त्यावर उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. वास्तविक मुलांच्या दप्तरापेक्षा त्यांच्यावरील अभ्यासाचे ओझे वाढत आहे. समाजात एखादी गोष्ट व्हायची असेल, तर त्याचे शिक्षण शाळेत द्यायला हवे, हे त्यामागचे सूत्र आहे. वाहतूक सुरळीत करायची असेल, तर त्याच्या नियमांचे शिक्षण शाळेपासूनच दिले पाहिजे; पर्यावरणाबद्दल जागरुकता आणायची आहे, तर शाळेत या विषयाची सक्तीच करायला हवी; उद्योजकतेचा विकास घडवायचा असेल, तर शाळेतच त्याचे धडे द्या; आपल्या संस्कृतीबद्दलच मुलांना माहिती नाही, मग त्याच्या शिक्षणाची सक्ती करा! मूल्ये रुजविण्यापासून व्यापक जनजागृती करण्यापर्यंतचा कोणताही विषय आला, की त्यावर आपल्याकडे एकच उत्तर तयार असते, ते म्हणजे : संबंधित विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करा. परिणामी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या विषयांची यादी लांबलचक होत चालली आहे.राज्य अभ्यासक्रम आराखड्याने नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तब्बल बारा विषय सुचविले आहेत. तीन भाषा, गणित, विज्ञान, समाजशास्त्र या पारंपरिक विषयांखेरीज कला शिक्षण, शारीरिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, स्काउट/गाइड हे विषय आहेत; शिवाय मुलांना समृद्ध करण्यासाठी अतिरिक्त तासिका आणि आंतरविद्याशाखेच्या ओळखीसाठीही तासिका आहेत. यामुळे खरे तर 'एक ना धड, भारंभार चिंध्या' असा प्रकार होण्याची शक्यता अधिक. या आराखड्यातील अशा अनेक मुद्द्यांच्या फेरविचाराची आवश्यकता आहे. पण विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत यासाठी वेळ आहे कोणाला?

# दिवाळी खरेदी करण्याची वेळ झाली...



दिवाळीमध्ये टीव्ही, फ्रीज, मोबाइल, लॅपटॉपसह अन्य इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल दिसून येतो. त्यामुळे दिवाळीत या वस्तूंच्या खरेदी-विक्रीमध्ये वाढ होते. दिवाळी आता अवघ्या काही दिवसांवर आली आहे. ग्राहक आता दुकानांत येऊ लागले आहेत. अधिकाधिक ग्राहक आपल्याकडे खरेदीसाठी यावेत यासाठी विक्रेत्यांकडून सवलतींचा वर्षाव करण्यात आला आहे. खरेदीवर खास भेटवस्तू देण्यासह क्रेडिट कार्डद्वारे पैसे भरल्यास 'कॅशबॅक' ऑफरही दिली जात आहे. 'जुनी वस्तू घेऊन या आणि नवीन वस्तू घेऊन जा', ही देखील ऑफर आहे. साधारणपणे जुन्या वस्तूचे दर हे त्या वस्तूच्या सद्य स्थितीवरून ठरवले जातात. तीच पद्धत आत्ताही दिसते आहे.अनेकांना संपूर्ण रक्कम एकरकमी देऊन टीव्ही, मोबाइल किंवा अन्य वस्तू खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे अवघा एक रुपया देऊन हफ्त्यावर शून्य टक्के व्याजदराने वस्तू खरेदी करण्याचे पर्याय उपलब्ध आहेत, असे ठाण्यातील विक्रेते रमेश शहा यांनी सांगितले. जवळपास ८० टक्के ग्राहक हफ्त्यावर वस्तू खरेदी करत असतात, अशी माहिती त्यांनी दिली. दिवाशीत मुख्यत्वे धनत्रयोदशी, पाडवा आणि भाऊबीज या दिवशी दुकानात खरेदीसाठी जास्त गर्दी होते, असे निरीक्षण देखील त्यांनी नोंदवले. तर, क्रेडिट कार्डवरुन ३० हजार रुपये किंमतीपासून पुढे दोन लाखांपर्यंतच्या वस्तू खरेदी केल्या जातात, असा अनुभव व्यापारी सुरेश जैन यांनी सांगितला.सध्या ग्राहक दुकानातून येऊन वस्तूविषयी चौकशी करुन जात आहेत. वस्तू बघून, त्यांची किंमत किती याची चौकशी करीत आहेत. आता प्रत्यक्ष खरेदीसाठी ते दिवाळीमध्ये येतील, असा विश्वास अन्य एका विक्रेत्याने व्यक्त केला. त्याचवेळी, ग्राहक ऑनलाइन खरेदीकडे वळत असल्याचा फटका देखील विक्रेत्यांना, व्यापाऱ्यांना बसतो आहे. घरच्या घरी मोबाइलव वस्तूंची ऑर्डर देता येते, वस्तूंमधील वैविध्य तपासता येते. त्यामुळे ऑनलाइन खरेदीचा ट्रेंड खूपच वाढत आहे. दुकानदारांच्या व्यवसायावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे, असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. ऑनलाइनमुळे व्यवसायाला सुमारे ३० ते ३५ टक्के आर्थिक फटका बसला आहे, असे विक्रेते सांगतात.हल्ली जवळपास प्रत्येक वस्तू ही ऑनलाइन खरेदी करता येते. ऑनलाइन बाजारात सर्वाधिक मागणी ही दिवाळीदरम्यान असते. ग्राहकांच्या मागण्या ओळखून ऑनलाइन व्यवसाय करणाऱ्या ई-कॉमर्स कंपन्यांनी दिवाळीच्या निमित्ताने नानावधी ऑफर्स आणल्या आहेत. मात्र या ऑफर्सखेरीज रात्री ११पर्यंत डिलिव्हरीची सोय, ही सध्याच्या खरेदी हंगामात ग्राहकांसाठी सर्वाधिक सोईची ठरत आहे.आघाडीच्या सर्वच ई-कॉमर्स कंपन्यांनी आत्तापर्यंत दिवाळीनिमित्त 'फेस्टिव्हल' सुरू केला आहे. त्याअंतर्गत प्रामुख्याने ४० ते ६० टक्के सवलत दिली जात आहे. हा फेस्टिव्हल दिवाळीची खरेदी होणाऱ्या धनत्रयोदशीपर्यंत आहे. त्याआधी वस्तूची खरेदी केल्यास नि:शुल्क डिलिव्हरीची सोय आहे. ऑनलाइन खरेदीत मोबाइल आघाडीवर आहे. मोबाइल खरेदीवर या ग्राहक कंपन्या हफ्त्याची सुविधा देत असून ठरावीक क्रेडिट कार्डवर खरेदी केल्यास अतिरिक्त २० टक्के सवलत, कॅशबॅक आदी सुविधाही देत आहेत. अशाच ऑफर्स इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या खरेदीवरदेखील आहेत.या क्षेत्रात वस्तू डिलिव्हरीचे व्यवस्थापन करणारे योगेश बापट यांच्या म्हणण्यानुसार, उत्सवी काळात डिलिव्हरीसाठीच्या वस्तूंचा आकडा किमान ४० टक्क्यांनी वाढतो. त्यामुळे एरव्हीच्या ७ ऐवजी आम्ही रात्री ११पर्यंत ग्राहकांपर्यंत वस्तू पोहोचवत आहोत. ग्राहकांसाठीदेखील ते सोयीचे असून यामुळे दिवाळीची खरेदी सणाआधी त्यांच्या हाती पडत आहे.सणासुदीच्या काळात मागणी वाढली असताना ऑनलाइन कंपन्या दोन दिवसांत डिलिव्हरीवर भर देत आहेत. यासाठी विशिष्ट संरचना त्यांनी विकसित केली आहे. या क्षेत्रात ग्राहक मागणीचे ऑनलाइन नियोजन करणारे विजय नाईक यांच्या म्हणण्यानुसार, 'एरवी वस्तूची मागणी ग्राहकांनी नोंदवली की ती मूळ विक्रेता ते ग्राहक यांच्या हाती पडेपर्यंत तीन ते चार ठिकाणी फिरून येते. त्यामध्ये मूळ विक्रेता ते त्याच्या जवळचे केंद्र, तिथून ग्राहक वास्तव्य करीत असलेल्या शहरातील मोठे केंद्र, तिथून त्या ग्राहकाच्या घराजवळील वस्तू संकलन केंद्र व त्यानंतर ग्राहकाच्या हाती वस्तू पडते. त्यात तीन ते चार दिवस किंवा त्याहून अधिक कालावधी खर्च होतो. आता दिवाळीमुळे मागणीत झालेली वाढ बघून विक्रेता ते त्याच्या जवळचे केंद्र व तेथून ग्राहकाच्या शहरातील केंद्र व त्यानंतर थेट ग्राहकाच्या हाती वस्तू आम्ही सोपवित आहोत. अनेकदा विक्रेता थेट शहरात वस्तू पाठवतो. यामुळे अधिकाधिक दोन दिवसांत डिलिव्हरी देणे शक्य होत आहे.नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) अनेकांच्या परिचयाची. भाज्या तसेच इतर वस्तूंच्या खरेदीसाठी येथे अनेकांचे जाणेयेणे असते. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये, अन्नधान्यासोबतच सुक्या मेव्याची उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढते. येथे घाऊक बाजारात वस्तूंच्या किमतीवर १५ ते २० टक्के सवलत असते. त्यामुळे बहुतांश लोक दिवाळीत पुढच्या सहा महिन्यांचा किराणा भरण्यासाठी येत असतात. शिवाय मुंबई आणि उपनगरातील अनेक दुकानदार, दुकानातील किराणा सामान घेण्यासाठी येतात. येथे अन्नधान्य, कडधान्य यांच्या घाऊक आणि किरकोळ दरांमध्ये २० ते ३० टक्के इतकी सवलत मिळते. दिवाळीच्या १५ दिवस आधी या बाजारात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते.एपीएमसीमध्ये मोठमोठी गोदामे, कोल्ड स्टोअरेज आदी सुविधा आता उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात माल साठवून ठेवला जातो आणि हवा तेव्हा, हवा तेवढा माल विक्रीसाठी बाहेर काढला जातो. त्यामुळे ऐनवेळी जाऊन जरी बाजारात एखाद्या वस्तूची मागणी केली तरी ती मिळू शकते. अन्नधान्ये, कडधान्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून या बाजारात येत असल्याने त्यातील वैविध्यही उपलब्ध असते.वाशीची बाजारपेठ ही सुक्या मेव्याची देशातील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. परदेशातून येणारा सुका मेवा इथूनच सर्वत्र पाठवला जात असतो. हा सुका मेवा वर्षभर बाजारात येत असतो. परदेशातून समुद्री मार्गाने तो जेएनपीटी येथे येतो. बाजाराच्या परिसरात कोल्डस्टोअरेजची उत्तम सुविधा उपलब्ध असल्याने वर्षभर इथे सुका मेवा साठवून ठेवला जातो. नंतर मागणीनुसार तो बाजारात आणला जातो. उपलब्ध सुक्या मेव्याची छाननी करून, त्याची प्रतवारी ठरवून, घाऊक आणि किरकोळ विक्रीसाठी ठेवला जातो.सुक्या मेव्यापैकी काजू, किशमिश आणि अक्रोड वगळता इतर सर्व पदार्थ परदेशातून नवी मुंबईतील बाजारात येत असतात. इतर शहरांतील सुक्या मेव्याच्या भावाची तुलना करता येथील सुक्यामेव्याचे दर खूपच कमी असतात. मालवण, कोकण, गोवा आणि बेंगळुरू येथून काजूची फार मोठ्या प्रमाणात आवक होते. तर किशमिश नाशिक, सांगलीमधून येतो. अंजीर आणि जर्दाळू अफगाणिस्तानातून येतो. तर बदामाची आवक इराण, अमेरिकेतून होते. खजूर सौदी अरेबिया आणि पिस्ता अमेरिका आणि ऑस्ट्रेलियामधून भारतात येतो.

दिवाळीत वा इतर वेळी देखील भेट म्हणून देण्यासाठी सुका मेवा हा उत्तम पर्याय. तो पौष्टिक तर असतोच, आणि महत्त्वाचे म्हणजे दीर्घ काळ टिकतो. खराब होत नाही. त्यामुळे दर वर्षीप्रमाणे यंदाही सुक्या मेव्याचे गिफ्ट बॉक्स उपलब्ध करून दिले जात आहेत. ही भेटवस्तू परवडण्याजोगी आणि उपयुक्त आहे. ग्राहकांची मागणी लक्षात घेता सध्या घाऊक बाजारात सुक्या मेव्याचे शंभर ग्रॅमचे पाकीट, पन्नास ग्रॅमचे पाकिट... अशी लहान पाकिटेही उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या छोट्या छोट्या पाकिटांना ग्राहकांमध्ये मोठी मागणी असते, असे माजी संचालक कीर्ती राणा सांगतात.दिवाळी जवळ आली होती. अगदी आठवड्यावर येऊन ठेपली होती. मुलाचे सहामाही परीक्षेतील दोन पेपर शिल्लक होते. 'चांगला अभ्यास कर, मग दिवाळीला नवीन कपडे घेऊन देऊ', असे आश्वासन आई-वडिलांकडून देण्यात आले होते. मात्र मुलाचे म्हणणे वेगळेच होते. अमूकच कपडे घेणार... मॉलमधूनच खरेदी करणार, असा त्याचा हट्ट होता...

दिवाळी म्हटली की वर उल्लेख केलेले चित्र जवळपास सगळ्यांच घरांमध्ये दिसते. दिवाळी म्हणजे चविष्ट, खमंग फराळ, दिवाळी म्हणजे धडाडधूम... प्रकाशाची बरसात करणारे फटाके, त्याचप्रमाणे दिवाळी म्हणजे नवीन, कोरेकरकरीत, छानसे कपडे हे समीकरण वर्षानुवर्षे चालत आले आहे. हल्ली कपड्यांची खरेदी तशी वर्षभर केली जात असली तरी दिवाळीला घेतल्या जाणाऱ्या कपड्यांचा मान काही औरच. नवीन कपड्यांच्या खरेदीशिवाय दिवाळीची खरेदी पूर्ण झाल्यासारखी वाटतच नाही. श्रीमंत, धनिकांच्या घरापासून ते अगदी सर्वसामान्य घरापर्यंत... सगळ्याच घरांमध्ये दिवाळीला कपडे खरेदी ही होतेच होते. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर अशी शहरे असोत, वा छोटी गावे... दिवाळीच्या कालावधीत कोट्यवधी रुपयांची कपडे खरेदी होत असते.किरकोळ विक्रेत्यांपासून ते अगदी पुरवठादार, घाऊक व्यापारी, कपडे उत्पादक ते कापड उत्पादक अशी मोठी साखळी कापड व्यवसायात असते. हल्ली कपडे शिवून घेण्याचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे. बहुतांश लोकांचा कल हा तयार कपडे विकत घेण्याकडेच असतो. तयार कपड्यांमध्ये नावाजलेल्या कंपन्यांचे उत्पादनाचे स्वतःच्या फॅक्टरी आहेत. या फॅक्टरींमध्ये कपडे बनविण्यापासून बाजारातील किरकोळ विक्रेत्यांपर्यंत कपडे पोहोचविण्याचे काम कंपनीमार्फत केले जाते. मुंबईत प्रामुख्याने दोन ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात कपडे आणले जातात. तमिळनाडू येथील तिरपूर येथून आणि लुधियाना येथून कपडे आणले जातात. शंभर टक्के कॉटनच्या कपड्यांसाठी तिरपूर हे प्रख्यात आहे. तर लुधियाना येथून पॉलिस्टर, नायलॉन, टेरीकॉट तसेच इतर प्रकारचे कपडे येतात. इतर राज्यांमधून मुंबईत कपड्यांची आवक मोठ्या प्रमाणात होते. सुरत आणि अहमदाबाद येथून महिलांचे तयार कपडे, साड्या, मुलींचे कपडे मुंबईच्या बाजारात येत असतात. रस्ते वाहतूक, रेल्वे अशा वेगवेगळ्या मार्गाने आलेला घाऊक माल मस्जिद बंदर येथे आणला जातो आणि त्यानंतर तो मुंबईच्या वेगवेगळ्या ठिकाणच्या कापड बाजारांमध्ये आणि तेथून किरकोळ विक्रेत्यांपर्यंत पोहोचविला जातो, असे मनिष मार्केटमधील एका घाऊक व्यापाऱ्याने सांगितले.मुंबईत बाहेरूनच कपडे येतात असे नाही; तर मुंबईच्या काही भागांत आजही मोठ्या प्रमाणात कपडे तयार केले जातात. वांद्रे-खार दरम्यान असलेला घास बाजार, सायन धारावी परिसरातील केला वखार यांसह मुंबईतील झोपड्यांमध्ये कपडे तयार करण्याचे लघुउद्योग चालतात. झोपडपट्ट्यांमध्ये हे कपडे तयार होत असले तरी मुंबईची फॅशन इथेच ठरते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. फॅशन स्ट्रीट, दादर, वांद्रे पाली हिल, मालाड, कुर्ला, घाटकोपर, भांडुप अशा अनेक ठिकाणी रस्त्याकडेला स्टॉलवर विक्री करण्यात येणारे फॅशनेबल कपडे इथेच तयार होत असतात. या कपड्यांना तरुणाईमध्ये प्रचंड मागणी आहे. मुंबईमध्ये मस्जिद बंदर येथील चकाला स्ट्रीट, दादर येथील तुळशीपाईप रोड येथील मार्केट, सायन येथील मार्केट त्याचप्रमाणे उपनगरात काही ठिकाणी कपड्यांचा घाऊक बाजार आहे.ानलाइन खरेदीचा ट्रेंड सध्या सगळीकडे आहे; मात्र कपड्यांसाठी नागरिक प्रत्यक्षातील खरेदीला पसंती देत असल्याचे अनेक व्यापारी सांगतात. स्क्रीनवर दिसणारा कपड्याचा रंग आणि कपडे घरी आल्यानंतर दिसणारा रंग यांत खूप फरक जाणवतो. साईज नीट समजत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात दुकानात जाऊन कपडे खरेदी करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. दुकानात कपडे न्याहाळता येतात, बहुतांश दुकानांमध्ये ट्रायल रूम असल्याने कपडे परिधान करून पाहता येतात. दरामध्ये घासाघीस करता येते. म्हणून ग्राहक ानलाइनपेक्षा कपड्यांसाठी तरी प्रत्यक्षात खरेदीला पसंती देतात.कपडे खरेदीसाठी दिवाळीचे औचित्य इतर सणांपेक्षा मोठे असते. या सणादरम्यान कापड बाजारात इतर दिवसांपेक्षा अधिक उलाढाल होते. त्यामुळे व्यवसाय वाढीचा व्यापाऱ्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे या कालावधीत सेल, सवलत, एकावर एक फ्री अशा वेगवेगळ्या योजना आणल्या जातात. अर्थातच हे सर्व नफा पाहूनच केले जाते. दिवसागणिक फॅशन बदलत असल्याने एकाच पद्धतीचे कपडे जास्त काळ ठेवता येत नाहीत. त्यांची लवकरात लवकर विक्री व्हावी, हा देखील या सवलतींचा एक उद्देश असतो, असे एक किरकोळ विक्रेता म्हणाला.दिवाळीच्या आनंदात भर टाकणारी एक गोष्ट म्हणजे मिळणारी भेटवस्तू. मोठमोठ्या कंपन्यांपासून ते कौटुंबिक पातळीवरही या भेटवस्तूंचे अप्रूप असते. मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचा तर तो दरवर्षीचा नित्यक्रमाचा भाग असतो. त्यामुळे अशा कंपन्यांना पुरवठा करणाऱ्यांचा हा हंगाम म्हणजे सुगीचा. त्यामुळे दिवाळीच्या तीन महिने आधीपासूनच अशा भेटवस्तू पुरवठादारांची तयारी सुरू होते. 'मोठा म्हणजे चार ते पाच हजार कर्मचारीवर्ग असणाऱ्या कंपन्यांचा कल कर्मचाऱ्यांना घरात वापरण्यायोग्य म्हणजे कुकर, मिक्सर, नॉन स्टिक, व्हॅक्युम क्लीनर, चादरी, टिफिन, बाटल्या, टॉवेल, बॅग अशा वस्तूंकडे असतो. तर, कमी कर्मचारी असणाऱ्या कंपन्या कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या 'क्लाएंट'ना फॅन्सी वस्तू देण्याबाबत आग्रही असतात. अशा ग्राहकांसाठी गरजेच्याच परंतु स्टायलिश, तुलनेने महागड्या वस्तू हव्या असतात. हल्ली भेटवस्तू म्हणून 'पॉट अँड ब्लूम'ची झाडे, लाकडाची लॅपटॉप टेबल अशा चाकोरीबाहेरच्या वस्तूंना मागणी होती,' अशी माहिती मुंबई, पुण्यासह अन्य शहरांत कंपन्यांना भेटवस्तू पुरवणारे मेट्रिक्स सोल्युशनचे भरत जैन यांनी दिली. जैन स्वतः दिवाळीच्या दोन ते तीन महिने आधीच ज्या वस्तूंना मागणी असू शकते अशा साधारण २० ते २५ वेगवेगळ्या वस्तूंचा प्रत्येकी किमान एक हजार नगांचा साठा करून ठेवतात. दिवाळीच्या ६० दिवस आधी कंपन्यांना वेगवेगळी सॅम्पल पाठवली जातात. त्यातही गेल्या वर्षी किंवा मागील दोन वर्षे या कंपन्यांनी काय भेटवस्तू दिल्या होत्या, हे तपासून या वस्तू वगळून अन्य वस्तूंची सॅम्पल पाठवली जातात. तेव्हा कुठे कंपन्यांकडून साधारण ४५ ते ५० दिवस आधी ऑर्डर मिळते आणि वस्तूंची मागणी नोंदवून तसा पुरवठा केला जातो. तर, १० ते २० वस्तू हव्या असणारे गरज भासेल तशा घेऊन जातात. यंदा हेडफोन्स, इअरबड्स, स्पीकर अशा इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सनाही पसंती मिळाल्याचे काही व्यापाऱ्यांनी सांगितले. विशेष म्हणजे दिवाळीच्या भेटवस्तूच्या बाजारपेठेवर बाजारातील मंदी, तेजीचा परिणाम होत नाही. ज्या कंपन्या कित्येक वर्षं भेटवस्तू देत आहेत, त्या देतातच, हा आमचा अनुभव आहे. मग मंदी असो वा तेजी. बजेट इकडेतिकडे होईल, परंतु ते भेटवस्तू देणे थांबवत नाहीत, असेही निरीक्षण काहींनी मांडले.

भेटवस्तू देणाऱ्याला लक्षात राहावी, ती अन्य भेटवस्तूंपेक्षा अनोखी दिसावी, यासाठी ती आकर्षक वेष्टनातून, डिझायनर बॉक्समधून देण्याकडेही यंदा कल वाढला आहे. एक हजार रुपये किमतीच्या भेटवस्तूचा बॉक्स ३०० रुपयांनी घेणाऱ्या कंपन्याही आहेत. ड्रायफ्रुट्ससाठी साधारण ५० ते ६० रुपयांचे बॉक्स असतात, पण यंदा २५० ते ३०० रुपयांचे बॉक्सचीही ऑर्डर होती, असेही जैन यांनी सांगितले.घरगुती स्तरावरही बहुतांश महिला वर्ग विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री करू लागला आहे. वैयक्तिक स्तरावरील भेटवस्तूंसाठी ग्राहकांची पसंती या विक्रेत्यांना असते. केतकी अग्निहोत्री या कलाकुसरीच्या, वेगळ्या, उपयुक्त अशा पोटली बॅग्स, पिचवाई कलाकुसर केलेल्या बॅग, डिझायनर ड्रायफ्रुट बॉक्स आदी छोट्या वस्तू तयार करवून घेऊन त्याची विक्री करतात. गणपतीपासूनच खरेदीचा अंदाज येतो, ट्रेन्ड कळतो, मग ऑर्डर देऊन वस्तू तयार करवून किंवा मागवून घेतल्या जातात. अगदी १५० रुपयांपासून वस्तूंची किंमत ठेवल्यामुळे एक व्यक्ती एकावेळी १० ते १५ वस्तूही घेऊन जाते. गणपती, नवरात्रीपासूनच खरेदीला किंवा ऑर्डर यायला सुरुवात होते, असे त्यांनी सांगितले.